# महात्मा फुले कृषि विद्यापीठ

राहुरी - ४१३ ७२२, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र)

## एप्रिल २०२६


# ई वार्ता




**LEGEND**

| | | |
|---|---|---|
| ■ | Central Campus of MPKV | |
| ● | Agril. Research Station | 27 |
| ★ | Post Graduate Institute | 01 |
| ✿ | Agril. Technology Information Centre | 01 |
| ⚘ | Regional Extension Centre | 04 |
| ✹ | District Extension Centre | 05 |
| ❄ | Krishi Vigyan Kendra | 04 |
| ✖ | Agricultural Tech. School | 08 |
| ✪ | Agricultural Engg. College | 02 |
| ✡ | Agricultural College | 08 |
| 8 | Horticulture College | 02 |
| © | ABM College | 01 |
| @ | Food Technology College | 01 |
| # | Agriculture Polytechnic | 01 |


मफुकृवि विस्तार प्रकाशन क्र.२९५१/२०२६

महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

# मफुकृवि ई वार्ता

एप्रिल २०२६

वर्ष :६, अंक क्रं. : ६४, एप्रिल, २०२६ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

## अखिल भारतीय समन्वित भुईमूग सुधार प्रकल्पाची तीन दिवसीय वार्षिक समूह बैठक संपन्न







**दि. २२ एप्रिल २०२६.** राष्ट्रीय स्तरावरील अखिल भारतीय समन्वित भुईमूग सुधार प्रकल्पाची तीन दिवसीय वार्षिक समूह बैठक महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या शासकीय कृषि महाविद्यालय, पुणे येथे आयोजित करण्यात आली होती. या बैठकीच्या अध्यक्षस्थानी नवी दिल्ली येथील भारतीय कृषि अनुसंधान परिषदेचे पीक विज्ञान विभागाचे उपमहासंचालक डॉ. डी.के. यादव होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणुन महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे मा. कुलगुरू डॉ. विलास खर्चे उपस्थित होते. याप्रसंगी व्यासपीठावर जुनागड येथील भारतीय भुईमूग संशोधन संस्थेचे संचालक डॉ. एस.के. बेरा, महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे संशोधन संचालक डॉ. प्रशांत बोडके, विस्तार शिक्षण संचालक डॉ. गोरक्ष ससाणे, अधिष्ठाता डॉ. साताप्पा खरबडे, पुणे कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. महानंद माने, जळगाव येथील तेलबिया संशोधन केंद्राचे प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. दीपक दहाट उपस्थित होते.

यावेळी मार्गदर्शन करताना डॉ. डी.के. यादव म्हणाले की आधिक उत्पादनक्षम वाण निर्मितीसाठी जीनोमिक निवड, प्रेडिक्टिव ब्रीडिंग, कृत्रिम बुद्धिमत्ता, स्पीड ब्रीडिंग यांचा समावेश होतो. तसेच फेनोटिपिक व जेनोटिपिक क्षमता वाढविणे, अन्नद्रव्य व पाणी वापर कार्यक्षमता सुधारणे आणि गुणवत्ताविषयक घटकांवर भर देणे महत्त्वाचे आहे. बदलत्या हवामान परिस्थितीत टिकून राहण्यासाठी बहुगुणधर्मीय व हवामान–ताण सहनशील वाणांची निर्मिती होणे गरजेचे आहे. भारतामध्ये खाद्यतेलाची एकूण मागणी सुमारे २४० ते २६० लाख टन इतकी असून देशांतर्गत उत्पादन १०० ते १२० लाख टन इतके आहे. भारताने अन्नधान्य उत्पादनात ३५६.८ दशलक्ष टन इतकी उल्लेखनीय कामगिरी साध्य केली असून तेलबिया उत्पादन सुमारे ४३ दशलक्ष टन आहे. तथापि या प्रगतीनंतरही देश खाद्यतेलाच्या आयातीवर मोठ्या प्रमाणावर अवलंबून आहे. विशेषतः शेंगदाणा पिकाच्या बाबतीत सुमारे ५५% गरज आयातीद्वारे पूर्ण केली जाते. ही तफावत कमी करण्यासाठी भारत सरकारने विविध तेलबिया विकास योजना राबवल्या असून सुमारे ३५ बियाणे हब्जची स्थापना करण्यात आली आहे. यासाठी जवळपास रु. ५०० कोटींची तरतूद करण्यात आली आहे. अखिल भारतीय समन्वित संशोधन प्रकल्पांतर्गत तंत्रज्ञान व सुधारित वाण विकसित करण्यात आले आहेत. मागील दशकात ७० पेक्षा अधिक शेंगदाणा वाणांची निर्मिती करण्यात आली आहे. संस्थात्मक स्तरावर अखिल भारतीय समन्वित प्रकल्पाचे डिजिटलायझेशन, डीएनए फिंगरप्रिंटिंग, उत्पादन प्रोफाइल विकास तसेच वाण चाचणी कालावधी तीन वर्षांवरून कमी करणे या उपाययोजना संशोधन कार्यक्षमता वाढवतील. याशिवाय संकरण कार्यक्रम आणि बेंचमार्किंग यावर भर देणे आवश्यक असल्याचे ते म्हणाले.

मा. कुलगुरू डॉ. विलास खर्चे प्रमुख मार्गदर्शन करतांना म्हणाले की बदलत्या हवामानाच्या पार्श्वभूमीवर हवामान अनुकूल तंत्रज्ञान, नवीन पिकांचे वाण, आधुनिक यंत्रसामग्री आणि शाश्वत शेती पद्धती विकसित करण्यासाठी विद्यापीठाचे संशोधन सुरू आहे. महात्मा फुले कृषि विद्यापीठाने विविध पिकांचे ३२० वाण, ५५ हून अधिक यंत्रे आणि २००० पेक्षा अधिक तंत्रज्ञान शिफारशी विकसित करून राज्याच्या कृषि विकासात मोठे योगदान दिले आहे. यासोबतच, विद्यापीठाच्या तंत्रज्ञानाचा प्रसार करण्यासाठी विस्तार यंत्रणा प्रभावीपणे कार्य करत असून महाराष्ट्र राज्यातील सिंचनाखालील क्षेत्र वाढत असल्याने तेलबिया आणि तत्सम पिकाखालील क्षेत्र वाढण्यास अधिक वाव असल्याचे त्यांनी नमूद केले. यावेळी डॉ. एस. के. बेरा यांनी आपले मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी मान्यवरांच्या हस्ते भुईमुग पिकावरील विविध प्रकाशनांचे

विमोचन करण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. प्रशांत बोडके यांनी केले. महात्मा फुले कृषि विद्यापीठाद्वारे सदरील बैठकीचे आयोजन करण्यात आले असून त्यास आर्थिक व तांत्रिक सहाय्य भारतीय कृषि अनुसंधान परिषद अंतर्गत भारतीय भुईमूग संशोधन संस्था जुनागड, गुजरात यांचे मार्फत करण्यात आलेले आहे. या बैठकीमध्ये देशातील विविध कृषि विद्यापीठांच्या संशोधन संस्था व केंद्रातील शास्त्रज्ञ सहभागी झाले असून भुईमूग पिकाच्या सुधारित वाणांची निर्मिती, उत्पादन वाढीसाठी नवीन तंत्रज्ञान, कीड रोग व्यवस्थापन, हवामान बदलाचा परिणाम आणि शाश्वत शेती पद्धती यावर सखोल चर्चा करण्यात येत आहे. या बैठकीमध्ये देशातील १९ राज्यातून १५० हून अधिक शास्त्रज्ञ सहभागी झाले आहेत. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. पल्लवी सुर्यवंशी यांनी तर आभार डॉ. दीपक दहाट यांनी मानले.

## मुंबई येथे नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पांतर्गत संवर्धित शेतीसाठी संशोधन करार संपन्न



**दि. २४ एप्रिल, २०२६.** हवामान बदलाच्या आव्हानांना तोंड देण्यासाठी आणि जमिनीचे आरोग्य सुधारण्यासाठी नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्यात एक मोठे पाऊल उचलण्यात आले आहे. महाराष्ट्रातील प्रमुख पीक पद्धतींमध्ये संवर्धित शेतीला चालना देण्याच्या उद्देशाने भारतीय मृदा विज्ञान संस्था, भोपाळ, डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी आणि महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी यांच्या सहकार्याने प्रकल्पातील २१ जिल्ह्यांमध्ये पुढील तीन वर्षांकरिता संशोधन हाती घेण्यात येणार आहे. या विषयीचे सामंजस्य करार लोकभवन, मुंबई येथे करण्यात आले. याप्रसंगी नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पाच्या प्रकल्प संचालिका श्रीमती मिनल करणवाल, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाचे मा. कुलगुरू डॉ. इंद्र मनी, महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे मा. कुलगुरू डॉ. विलास खर्चे, डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठाचे मा. कुलगुरू डॉ. शरद गडाख, भारतीय मृदा विज्ञान संस्थेचे डॉ. नरेंद्र कुमार लेंका, प्रकल्पाचे कृषिविद्या तथा मृदाविज्ञान विशेषज्ञ डॉ. विजय कोळेकर, सर्व कृषि विद्यापीठांचे संचालक संशोधन, मृदविज्ञान विभाग प्रमुख व इतर प्रकल्प अधिकारी उपस्थित होते.

जमिनीतील सेंद्रिय कर्ब वाढविण्याचा सर्वात शाश्वत मार्ग म्हणून शून्य मशागत-संवर्धित शेतीपद्धतीकडे जगातील अनेक देश वळत आहेत. नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यात २०१९ ते २०२४ या काळात शेतीशाळा घेऊन शून्य मशागत तंत्राचा प्रसार केला असून मराठवाडा-विदर्भात कापूस, सोयाबीन, मका, तूर, हरभरा या प्रमुख पिकांचे अनेक शेतकरी जमिनीची नांगरणी न करता शून्य मशागत पद्धतीने चांगले उत्पादन घेत असल्याचे दिसून आले आहे. या पद्धतीने शेतकऱ्यांना उत्पादन वाढीबरोबरच उत्पादन खर्चामध्ये मोठी बचत आणि मातीच्या गुणधर्मांमध्ये लक्षणीय सुधारणा झाल्याचे आढळून आलेले आहे. परंतु या पिकांसाठी कृषि विद्यापीठाकडून शून्य मशागत पद्धतीसाठी शिफारस नसल्याचे लक्षात आले आहे. त्यामुळे सदर प्रकल्पांतर्गत याविषयी संशोधन प्रकल्प राबविण्याचे निश्चित केले आहे. मात्र हे संशोधन केवळ विद्यापीठाच्या परिसरात घेण्यात येणार नसून त्याबरोबरच ते शेतकऱ्यांच्या सहभागाने प्रकल्पातील जिल्ह्यांमधील ८४ गावातील निवडक २५२ प्रयोगशील शेतकऱ्यांच्या शेतावरही राबविण्यात येणार आहे. हे समांतर सहभागीय संशोधन केल्यामुळे शेतकऱ्यांपर्यंत तंत्रज्ञान पोहोचविण्यासाठी लागणारा वेळ लक्षणीयरीत्या वाचणार आहे. या संशोधन प्रकल्पामुळे महाराष्ट्रातील शेती अधिक हवामान अनुकूल होऊन जमिनीचे आरोग्य सुधारण्यास मोठी मदत होईल.

महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

मफुकृवि ई वार्ता

एप्रिल २०२६

## राष्ट्रीय पातळीवरील तंत्रज्ञान तिफन या स्पर्धेचा कृषि विद्यापीठात उत्साहात प्रारंभ






**दि. २ एप्रिल, २०२६.** महात्मा फुले कृषि विद्यापीठामध्ये महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी व सोसायटी ऑफ ऑटोमोटीव्ह इंजिनियर्स, इंडिया यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय पातळीवरील तंत्रज्ञान तिफन–२०२६ या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. दोन दिवस चालणाऱ्या ट्रॅक्टरचलीत भाजीपाला पूर्नलागवड यंत्रे या विषयावरील या स्पर्धेचे उद्घाटन कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे मा. कुलगुरु डॉ. विलास खर्चे होते. याप्रसंगी या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून सोसायटी ऑफ ऑटोमोटिव्ह इंजिनियर्स, इंडियाचे अध्यक्ष डॉ. नागराजन गोविंदन उपस्थित होते. यावेळी अधिष्ठाता डॉ. साताप्पा खरबडे, कृषि अभियांत्रिकी महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. सचिन नलावडे, सोसायटी ऑफ ऑटोमोटिव्ह इंजिनियर्सचे ऑफ हायवे बोर्डाचे अध्यक्ष श्री. कृष्णांत पाटील, कंपनीचे आयटी इन्फ्रास्ट्रक्चरचे प्रमुख श्री. रिहान अख्तर, कमिंस इंडिया लिमिटेडच्या संचालिका कु. अस्मिता खैरनार, जॉन डीअरचे प्रोडक्शन सिस्टीमचे प्रमुख श्री. विवेक यादव, कार्यक्रमाच्या संयोजिका कु. शितल कोलते, बीकेटी कंपनीचे जनरल मॅनेजर श्री. सुहास पाटील उपस्थित होते.

याप्रसंगी मा. कुलगुरु डॉ. विलास खर्चे अध्यक्षीय मार्गदर्शन करतांना म्हणाले की आपल्या देशात यांत्रिकीकरणाला मोठा वाव असल्यामुळे कृषि अभियंते भारतीय शेतीसाठी महत्त्वाची भूमिका बजावू शकतात. आपल्या देशात छोटे व अल्पभूधारक शेतकऱ्यांची संख्या जास्त असल्याने त्यांच्या गरजेनुसार छोटे यंत्र व अवजारे विकसित करून भारतातील शेतकरी व शेतीसाठी तिफनसारख्या स्पर्धेतून शाश्वत तंत्रज्ञान देता येणे शक्य आहे. आपल्या देशातील शेतीमधील यांत्रिकीकरणांमध्ये प्रचंड बदल झाले असून यांत्रिकीकरणाला कृत्रिम बुद्धिमत्ता, ड्रोन आणि रोबोटिक्सची साथ मिळाली आहे. महात्मा फुले कृषि विद्यापीठामध्ये ड्रोन, रोबोटिक्स यासारख्या डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर शेतीमधील नाविन्यपूर्ण संशोधनासाठी होत आहे. यावेळी डॉ. नागराजन गोविंदन मार्गदर्शन करतांना म्हणाले की डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर प्रत्येक उद्योगांमध्ये होताना दिसत आहे. सोसायटी ऑफ ऑटोमॅटिक इंजिनियर्स ऑफ इंडिया या संस्थेने सुरू केलेली राष्ट्रीय पातळीवरील तिफन या स्पर्धेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या अंगी असलेल्या कौशल्यामधून उद्योगासाठी तसेच शेतीसाठी महत्त्वाचे ठरणारे तंत्रज्ञान विकसित होईल असे यावेळी ते म्हणाले.

याप्रसंगी श्री. कृष्णांत पाटील, श्री. रिहान अख्तर व कु. अस्मिता खैरनार यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक तिफनच्या संयोजिका कु. शितल कोलते यांनी केले. या स्पर्धेचे हे आठवे वर्ष असून या स्पर्धेचा विषय ट्रॅक्टरचलीत किंवा स्वयंचलीत भाजीपाला पूर्नलागवड यंत्रे हा आहे. सदर स्पर्धेसाठी देशातील विविध अभियांत्रिकी महाविद्यालयातील ६६ संघ सहभागी झाले होते. त्यातील अंतीम फेरीसाठी नऊ राज्यातून ३९ संघाची अंतीम फेरीमध्ये निवड झालेली आहे. यामध्ये हरियाणा, केरळ, मध्य प्रदेश, महाराष्ट्र, पंजाब आणि तामिळनाडू यासह विविध राज्यातील एकुण ३९ संघ सहभागी झालेले आहे. दोन दिवस चालणाऱ्या या स्पर्धेत अंतिम ३९ संघानी बनविलेल्या ट्रॅक्टरचलीत भाजीपाला पूर्नलागवड यंत्रांच्या पाच वेगवेगळ्या सेक्शनमध्ये चाचण्या होणार असून त्यानंतर प्रत्यक्ष शेतावरती देखील या यंत्रांची परिक्षा घेतली जाणार असल्याचे डॉ. सचिन नलावडे व संयोजक श्री. संदीप राजपूत यांनी सांगितले. या अंतिम फेरीत ३९ संघातील स्पर्धेसाठी एकुण ८०० विद्यार्थी व विद्यार्थीनी आणि ५० पेक्षा जास्त मार्गदर्शक सहभागी झालेले आहेत. विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या कृषि यंत्रांची गुणवत्ता तपासण्यासाठी राष्ट्रीय पातळीवरील ३० पंचांची नेमणूक करण्यात आलेली आहे. या कार्यक्रमासाठी कृषि अभियांत्रिकी महाविद्यालयाचे विविध विभागांचे विभाग प्रमुख डॉ. शैलेंद्र गाडगे, डॉ. विक्रम कड आणि प्राध्यापक व कर्मचारी तसेच कार्यक्रमाचे सहसंयोजक इंजि.रोहन जगदाळे, संयोजक कमिटीचे पदाधिकारी कु. शितल कोलते, पराग चौधरी, सुशांत कदम, शिवानी खंडार, संदीप, ऋषिकेश शिंदे, कुलदीप सिंगल, अजय अग्रवाल इत्यादी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जॉन डीअर कंपनीच्या कु. पूजा पाटील व कु. स्नेहलता म्हात्रे यांनी केले.

## कृषि मूल्य साखळी बळकटीकरणासाठी महात्मा फुले कृषि विद्यापीठ आणि सह्याद्री फार्म्स यांच्यात सामंजस्य करार



**दि. ३ एप्रिल, २०२६.** शैक्षणिक संशोधन आणि खाजगी कृषि उद्योग यांच्यातील दरी कमी करून मूल्य साखळी बळकटीकरणाच्या दृष्टीने महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी आणि सह्याद्री फार्म्स यांच्यात महत्वपूर्ण सामंजस्य करार करण्यात आला. हा करार नाशिक जिल्ह्यातील मोहाडी येथील सह्याद्री फार्म्स मुख्यालयात मा. कुलगुरु डॉ. विलास खर्चे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. सामंजस्य करारावर कृषि विद्यापीठाच्या वतीने संशोधन संचालक डॉ. प्रशांत बोडके यांनी तर सह्याद्री फार्म्सच्या वतीने सह्याद्री फार्म्सचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक श्री. विलास शिंदे यांनी स्वाक्षऱ्या केल्या.

याप्रसंगी मा. कुलगुरु डॉ. विलास खर्चे मार्गदर्शन करताना म्हणाले या सामंजस्य करारांतर्गत संयुक्त संशोधन, विस्तार सेवा व प्रगत प्रशिक्षण उपक्रम राबवून संपूर्ण कृषि मूल्य साखळी बळकट करण्यावर भर दिला जाणार आहे. राहुरी कृषि विद्यापीठाच्या शैक्षणिक व संशोधन कौशल्याचा आणि सह्याद्री फार्म्सच्या व्यापक शेतकरी जाळ्याचा लाभ घेत शेतकऱ्यांसाठी परिणामकारक व प्रत्यक्ष उपयोगी नवकल्पना विकसित करण्याचे उद्दिष्ट आहे. या करारामुळे कृषिच्या विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकी ज्ञान न मिळता प्रत्यक्ष उद्योगाचा अनुभव मिळणार आहे. विद्यापीठातील पदवी आणि पदव्युत्तर विद्यार्थ्यांना सह्याद्री फार्म्सच्या अत्याधुनिक प्रक्रिया केंद्रांमध्ये काम करण्याची संधी मिळेल. यामुळे त्यांना काढणीपश्चात तंत्रज्ञान, निर्यात दर्जाचे व्यवस्थापन आणि पुरवठा साखळीचे प्रत्यक्ष प्रशिक्षण मिळेल. ज्या विद्यार्थ्यांना स्वतःचा कृषि उद्योग सुरू करायचा आहे त्यांच्यासाठी सह्याद्री फार्म्स आणि विद्यापीठाच्या इन्क्युबेशन सेंटरच्या माध्यमातून विशेष मार्गदर्शन दिले जाईल. यामुळे नोकरी शोधणाऱ्या विद्यार्थ्यांऐवजी रोजगार निर्माण करणारे नवे कृषि उद्योजक घडण्यास मोठी मदत होईल. शेतकऱ्यांच्या आर्थिक उन्नतीच्या दृष्टीने हा करार एक मैलाचा दगड ठरणार आहे. विद्यापीठाच्या संशोधनातून विकसित झालेले प्रगत तंत्रज्ञान थेट शेतकऱ्यांच्या बांधावर पोहोचेल. या तंत्रज्ञानाच्या साथीने पिकवलेल्या दर्जेदार शेतमालाला सह्याद्री फार्म्सच्या माध्यमातून थेट जागतिक आणि देशांतर्गत बाजारपेठेशी जोडले जाईल. याप्रसंगी राहुरी विद्यापीठाचे अन्नशास्त्र व तंत्रज्ञान विभाग प्रमुख डॉ. विक्रम कड, निफाड येथील कृषि संशोधन केंद्राचे प्रमुख प्रा. भालचंद्र मस्के, सह्याद्री फार्म्सचे संचालक श्री. मंगेश भास्कर, श्री. गणेश कदम, एच-स्क्वेअर इन्क्युबेशन सेंटरचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. प्रमोद राजेभोसले तसेच डिजिटल इम्पॅक्ट स्क्वेअरचे नवोपक्रम व उद्योजकता प्रमुख श्री. संदीप शिंदे उपस्थित होते. या भागीदारीमुळे शाश्वत शेती पद्धती, अन्न विज्ञानातील प्रगती आणि कृषि उद्योजकतेसाठी नवीन संधी निर्माण होतील. तसेच शेतकऱ्यांना आधुनिक व संशोधनाधारित उपाययोजना उपलब्ध होऊन त्यांचे खऱ्या अर्थाने सक्षमीकरण होईल असा विश्वास उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केला.

## महात्मा फुले कृषि विद्यापीठात तिफन २०२६ कार्यक्रम संपन्न

**दि. ३ एप्रिल, २०२६.** महात्मा फुले कृषि विद्यापीठामध्ये महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी व सोसायटी ऑफ ऑटोमोटिव्ह इंजिनियर्स, इंडिया यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय पातळीवरील तंत्रज्ञान तिफन २०२६ या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. दोन दिवसांपासून सुरू असलेल्या ट्रॅक्टरचलित भाजीपाला पुर्नलागवड यंत्रे या विषयावरील या स्पर्धेचा समारोपप्रसंगी झालेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नवी दिल्ली येथील भारतीय कृषि अनुसंधान परिषदेच्या शेती अभियांत्रिकी विभागाचे सहाय्यक महासंचालक डॉ. के. पी. सिंग होते. याप्रसंगी या






कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून सोसायटी ऑफ ऑटोमोटिव्ह इंजिनियर्स इंडियाचे उपाध्यक्ष डॉ. राजेंद्रन उपस्थित होते. यावेळी कृषि अभियांत्रिकी महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. सचिन नलावडे, एचएमएलडी इंजीनियरिंगचे संचालक श्री. निलेश देशपांडे, सोसायटी ऑफ ऑटोमोटिव्ह इंजिनियर्स इंडियाचे ऑफ हायवे अध्यक्ष डॉ. कृष्णांत पाटील, सोसायटी ऑफ ऑटोमोटिव्ह इंजिनियर्स इंडियाचे श्री. महेश मासुरकर, सोसायटी ऑफ ऑटोमोटिव्ह इंजिनियर्स इंडियाचे सचिव श्री. अजय अग्रवाल, तिफन २०२५ चे संयोजक श्री. संदीप राजपूत, तिफन २०२६च्या संयोजका कु. शितल कोलते, सहसंयोजका कु. शामला चौगुले व तिफन २०२६ चे सहसंयोजक श्री. रोहन जगदाळे उपस्थित होते.

याप्रसंगी मार्गदर्शन करतांना डॉ. के. पी. सिंग म्हणाले की आपण नाविन्याचा शोध घेणारे तरुण शोधक आहात. संशोधक पूर्वी झालेल्या संशोधनाचा आढावा घेऊन संशोधन करतात परंतु शोधक जगाला माहीत नसलेल्या गोष्टी शोधून काढतात. तुम्ही तुमच्या संशोधक वृत्तीद्वारे वापरण्यास सहज असणारे व सर्वांना परवडणारे यंत्र विकसित करू शकाल. कृत्रिम बुद्धिमत्ता तसेच रोबोटिक्सच्या तंत्रज्ञानाला कृषि यांत्रिकीकरणांमध्ये उज्वल भवितव्य असून सन २०४७ पर्यंत भारत जगातील सर्वात मोठा निर्यातदार देश ठरू शकतो. यावेळी डॉ. राजेंद्रन आपल्या मार्गदर्शनात म्हणाले की तुम्ही सर्व अभियंते हे या स्पर्धेमध्ये फक्त भाग घेतलेले नसून तुम्ही सर्व अभियंते हे भविष्यातील तंत्रज्ञानातील नेते आहात. ही स्पर्धा म्हणजे ज्यांनी आपले जीवन पूर्णपणे शेतीसाठी समर्पित केले त्या शेतकरी वर्गाच्या हितासाठी आणि आपल्या देशासाठी विकासामध्ये काहीतरी करून दाखविण्याची पर्वणी आहे. तुम्ही बनविलेले डिझाईन तसेच नवकल्पना या शेतकऱ्यांच्या फायद्याच्या आहेत. यावेळी डॉ. सचिन नलावडे, श्री. निलेश देशपांडे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला कु. शितल कोलते यांनी तिफन २०२६ च्या प्रवासाविषयी माहिती दिली. यावेळी या तिफन २०२६ या स्पर्धेतील विविध पारितोषिकांचे वितरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी विजेत्या व उपविजेत्या संघास मान्यवरांच्या हस्ते रोख रकमेची पारितोषिके आणि सन्मानचिन्हे देऊन गौरविण्यात आले तसेच या स्पर्धा यशस्वी करण्यामध्ये सहभागी सदस्यांचा गौरव करण्यात आला. यावेळी या स्पर्धेसाठी प्रायोजक म्हणून काम केलेल्या विविध कंपन्यांना मान्यवरांच्या हस्ते मानचिन्हे देऊन गौरविण्यात आले. याप्रसंगी डॉ. कृष्णांत पाटील यांनी पुढील वर्षी होणाऱ्या तिफन २०२७ या स्पर्धेचे समन्वयक म्हणून श्री. रोहन जगदाळे यांच्या नावाची घोषणा केली. या कार्यक्रमासाठी कृषि अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या विविध विभागांचे विभाग प्रमुख, प्राध्यापक व कर्मचारी तसेच संयोजक कमिटीचे पदाधिकारी श्री. पराग चौधरी, श्री. सुशांत कदम, श्री. संदीप बुरली, श्री. ऋषिकेश शिंदे, श्री. कुलदीप सिंगल, श्री. अजय अग्रवाल, श्री. विनयकुमार इत्यादी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. पूजा पाटील व कु. स्नेहलता म्हात्रे यांनी तर आभार कु. शामल चौगुले यांनी मानले.

## महात्मा फुले कृषि विद्यापीठात महात्मा जोतीबा फुले यांची १९९ वी जयंती उत्साहात साजरी

**दि. ११ एप्रिल, २०२६.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथे राष्ट्रीय सेवा योजना संचालनालय आणि विद्यार्थी कल्याण अधिकारी कार्यालयाच्या वतीने डॉ. नानासाहेब पवार सभागृहात महात्मा जोतीबा फुले यांची १९९ वी जयंती साजरी करण्यात आली. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे मा. कुलगुरू डॉ. विलास खर्चे होते. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून नागपूर पंचायत समितीचे गटविकास अधिकारी श्री. सचिन सूर्यवंशी उपस्थित होते. यावेळी व्यासपीठावर संचालक विस्तार शिक्षण डॉ. गोरक्ष ससाणे, प्रक्रिया अभियांत्रिकीचे विभाग प्रमुख डॉ. कैलास कांबळे, उपकुलसचिव श्री. व्ही. टी. पाटील, कृषि तंत्रज्ञान माहिती केंद्राचे प्रमुख डॉ. पंडित खर्डे, कार्यक्रमाचे आयोजक राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक तथा विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. विलास आवारी उपस्थित होते.




यावेळी मार्गदर्शन करतांना मा. कुलगुरू डॉ. विलास खर्चे म्हणाले की आपल्या विद्यापीठाला महात्मा जोतिराव फुले यांचे नाव मिळाले असून हे आपले भाग्यच आहे. आपल्या विद्यापीठाचा देशातच नव्हे तर देशाबाहेरही नावलौकिक आहे. महात्मा फुलेंनी स्त्री शिक्षण, समता आणि शेतकऱ्यांसाठी लढा दिला. त्यांच्या विचारांनी भारतीय समाज व्यवस्थेला नवी दिशा दिली. आजचे युग हे विज्ञानाचे व गतिमान संशोधनाचे आहे. या गतिमान युगात आजही त्यांचे विचार प्रेरणादायी आणि दिशादर्शक आहेत. प्रमुख मार्गदर्शन करताना श्री. सचिन सूर्यवंशी म्हणाले यावर्षीपासून महात्मा फुलेंचे द्विशताब्दी वर्ष सुरू होत आहे. महात्मा फुलेंनी दीडशे वर्षांपूर्वी व्यक्त केलेले विचार आजही दिशादर्शक आहेत. त्यांना प्रचंड दूरदृष्टी होती. ज्या गोष्टींसाठी त्यांनी त्यावेळी संघर्ष केला त्या गोष्टींसाठी आजही सामान्य जनतेला संघर्ष करावा लागत आहे. स्त्री शिक्षणाचा त्यांनी नुसता विचारच मांडला नाही तर तो कृतीत आणून दाखविला. शेतकऱ्यांच्या विविध समस्यांसाठी त्यांनी लढा उभा केला. मानव जातीच्या समतेसाठी त्यांनी मोठा संघर्ष केला. शेतीला विज्ञानाची जोड द्या, यांत्रिकीकरणावर भर द्या असे पत्र लिहून इंग्रजांना सांगणारे हे पहिले भारतीय होते. पीक स्पर्धा आयोजित करा, गोहत्या थांबवा, जलसंधारण करा असे राज्यकर्त्यांना सांगणारे ते पहिले थोर पुरुष होते. आपल्या राज्याच्या मातीत समतेचे बीज पेरणाऱ्या ह्या थोर पुरुषाची जयंती म्हणजे त्यांच्या विचारांचा वारसा पुढे नेण्याची एक संधी आहे. आपल्या विचारांना कृतीत आणून त्या उपक्रमांना संस्थात्मक पाठबळ देणारे हे पहिले थोर पुरुष होते म्हणून ते या देशाचे महात्मा झाले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक विद्यार्थी कुशाल सोनवणे यांनी केले. स्वागत व पाहुण्यांची ओळख डॉ. विलास आवारी यांनी करुन दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यार्थिनी तृप्ती पाटील व विनया पाटील यांनी तर आभार सुदर्शन लाटे यांनी मानले. या कार्यक्रमासाठी विभाग प्रमुख, प्राध्यापक व पदव्युत्तर महाविद्यालय तसेच कृषि अभियांत्रिकी महाविद्यालयाचे विद्यार्थी, विद्यार्थीनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## कृषि महाविद्यालय, संशोधन केंद्र व तंत्र विद्यालयांचे विविध उपक्रम

### कृषि महाविद्यालय, पुणे येथे भुईमूग पिकाची तीन दिवसीय वार्षिक समूह बैठक संपन्न

**दि. २३ एप्रिल, २०२६.** कृषि महाविद्यालय, पुणे येथे अखिल भारतीय समन्वित भुईमूग संशोधन प्रकल्पाची तीन दिवसीय वार्षिक समूह बैठक पार पडली. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे संशोधन संचालक डॉ. प्रशांत बोडके उपस्थित होते. यावेळी व्यासपीठावर भारतीय भुईमूग संशोधन संस्था जुनागडचे संचालक डॉ. एस.के. बेरा, भारतीय कृषि संशोधन परिषद, नवी दिल्ली येथील तेलबिया आणि कडधान्य विभागातील प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. एस. के. झा, बियाणे विभागातील प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. पी.आर. चौधरी आणि जळगाव येथील तेलबिया संशोधन केंद्राचे प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. दीपक दहाट उपस्थित होते. यावेळी आपल्या अध्यक्षीय मार्गदर्शनामध्ये डॉ. प्रशांत बोडके यांनी उच्च तेलांश आणि उत्पादनक्षमतेमुळे भुईमूग पिकाला देशाच्या खाद्यतेल आत्मनिर्भरतेमध्ये महत्त्वपूर्ण स्थान मिळणार असून २०३१ पर्यंतचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी संशोधन, धोरण आणि अंमलबजावणी यामध्ये समन्वय आवश्यक असल्याचे सांगितले. यावेळी त्यांनी भुईमूग पिकातील कमी गुणोत्तराने होणारी वाढ आणि अल्फाटॉक्सिन प्रदूषण यासारख्या महत्त्वपूर्ण अडचणीकडे लक्ष वेधले आणि कार्यक्षम पाणी व्यवस्थापन तंत्रज्ञान, प्रगत वाण सुधारणा, आंतरपीक पद्धतींचा अवलंब यावर भर देऊन उत्पादन खर्च कमी करण्यासाठी यांत्रिकीकरणाचे महत्त्व अधोरेखित केले. डॉ. एस.के. बेरा यांनी आपल्या मनोगतात वार्षिक समुह बैठकीत झालेल्या चर्चांना फलंदाजी व दिशादर्शक असे संबोधले आणि देशातील खाद्यातील क्षेत्राच्या प्रगतीसाठी सदरची बैठक उपयुक्त ठरणार असल्याचे नमूद केले. डॉ. एस.के. झा यांनी बियाणे व्यवस्थेला अधिक बळकट करण्यावर भर देत असताना केंद्रक बियाणे आणि पैदासकार बियाणे उत्पादन वाढवण्याची गरज व्यक्त

वर्ष :६, अंक क्रं. : ६४, एप्रिल, २०२६ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी





केली. बीज उत्पादन केंद्राचा विस्तार करणे, शेतकरी सहभागातून बियाण्याचे उत्पादन वाढविणे तसेच एकात्मिक रोग व किडी व्यवस्थापन यांचेही महत्त्व त्यांनी स्पष्ट केले. यावेळी डॉ. पी.आर. चौधरी यांनी या वार्षिक समूह बैठकीतील शिफारशी वैज्ञानिक दृष्ट्या सक्षम असल्याचे नमूद केले आणि बीजोत्पादन वाढवणे, विभाजित प्रजनन पद्धती सुधारणा कार्यक्रम राबविणे आणि हवामान बदलास तोंड देणारे बहुगुणी वाण विकसित करण्यावर भर दिला पाहिजे असे सांगितले. यावेळी सर्वोत्तम कार्य करत असलेल्या विविध अखिल भारतीय समन्वित संशोधन प्रकल्प केंद्रांना पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. पल्लवी सूर्यवंशी यांनी तर आभार डॉ. दीपक दहाट यांनी मानले. या बैठकीसाठी देशातील १९ राज्यातील शास्त्रज्ञांनी आपला सहभाग नोंदविला.

## रासायनिक खतांचा वापर कमी करण्यासाठी जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन





**दि. १० एप्रिल, २०२६.** महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे मा. कुलगुरू डॉ. विलास खर्चे यांच्या सूचनेनुसार येत्या खरीप हंगामात रासायनिक खतांचा वापर कमी करून पर्यायी खतांचा शेतकऱ्यांनी अवलंब करण्यासाठी जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कृषि विज्ञान केंद्र, बोरगाव व महाराष्ट्र शासन, कृषि विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने मौजे शेळकेवाडी, ता.जि. सातारा या ठिकाणी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी कसबे डिग्रज येथील कृषि संशोधन केंद्राचे मृदा शास्त्रज्ञ डॉ. संग्राम काळे यांची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी बोरगाव कृषि विज्ञान केंद्राचे विषय विशेषज्ञ प्रा. भूषण यादगिरवार, मृदा शास्त्रज्ञ प्रा. संग्राम पाटील, सहाय्यक कृषि अधिकारी श्री. धनाजी फडतरे उपस्थित होते.

यावेळी डॉ. संग्राम काळे मार्गदर्शन करताना म्हणाले की येत्या खरीप हंगामात रासायनिक खतांचा संतुलित वापर होण्यासाठी कृषि विद्यापीठामार्फत खत बचतीची विशेष जनजागृती मोहीम हाती घेण्यात आली आहे. पिकांच्या अन्नद्रव्यांसाठी केवळ रासायनिक खतांवरच अवलंबून न राहता जमिनीत जास्तीत जास्त सेंद्रिय खते, शेणखत, कंपोस्ट, गांडूळखत, नाडेप खत व हिरवळीचे खत वापरणे आवश्यक आहे. यामुळे जमिनीच्या भौतिक व जैविक गुणधर्मात सुधारणा होते. अन्नद्रव्यांची उपलब्धता व उपयुक्तता वाढते. रायझोबियम, ॲझोटोबॅक्टर, पीएसबी व केएसएम यासारखे जिवाणू संवर्धक प्रत्येक पिकात शिफारशीप्रमाणे बीजप्रक्रियेसाठी वापरल्यास रासायनिक खतांच्या वापरात बचत

होते. पिकांना आवश्यक अन्नद्रव्यांची गरज भागविण्यासाठी खतांची बाजारातील उपलब्धता, सद्यस्थितीतील किमतीनुसार येणारा खर्च, कृषि विद्यापीठाच्या शिफारशीनुसार खत मात्रा आदी बाबींचा विचार करावा तसेच माती परीक्षणानुसार किंवा जमीन सुपीकता निर्देशांकानुसार खतांचा वापर केल्यास शेतकऱ्यांना फायदा होतो असे यावेळी ते म्हणाले. प्रा.संग्राम पाटील यांनी माती परीक्षणासाठी नमुने गोळा करण्यासंदर्भात कृती करून दाखविली. यावेळी किन्वित सेंद्रिय खत प्रकल्पांतर्गत ऊस पिकाच्या प्रात्यक्षिक प्रक्षेत्रावर शिवार फेरी आयोजित करण्यात आली होती. याप्रसंगी प्रा. भूषण यादगिरवार यांनी या प्रकल्पाविषयी माहिती देताना सांगितले की भारत सरकारच्या गोबरधन योजनेअंतर्गत मौजे शेळकेवाडी येथे ऊस पिकात दहा शेतकऱ्यांच्या प्रक्षेत्रावर प्रात्यक्षिके आयोजित करण्यात आली आहेत. यावेळी घनजीवामृत तयार करण्याचे प्रात्यक्षिक घेण्यात आले. याप्रसंगी ऊस पिकातील विविध प्रश्नांवर चर्चा करण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री. धनाजी फडतरे यांनी केले. कार्यक्रमाचे स्वागत श्री. प्रवीण शेळके यांनी केले. कार्यक्रमाचे आभार विद्या शेळके यांनी मानले.

## शेंद्रे येथे आले पीक परिसंवादाचे आयोजन



**दि. १३ एप्रिल, २०२६.** बोरगाव येथील कृषि विज्ञान केंद्र आणि कृषि विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने शेंद्रे ता. सातारा येथे आले पीक परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी जिल्हा परिषद सदस्या सौ. पूजा मोरे, बोरगाव कृषि विज्ञान केंद्राचे विषय विशेषज्ञ प्रा. भूषण यादगिरवार, सातारा तालुका कृषि अधिकारी श्री. तेजदीप ढगे, नागठाणेचे मंडल कृषि अधिकारी श्री. अजय पवार, सरपंच श्री. असलम मुलानी व सहाय्यक कृषि अधिकारी सौ. हेमलता फडतरे उपस्थित होते.

यावेळी प्रा. भूषण यादगिरवार यांनी आले पिकाविषयी मार्गदर्शन करताना जमिनीची पूर्वतयारी कशी करावी, बियाणे निवडताना कोणती काळजी घ्यावी, बीजप्रक्रिया आणि जैविक खतांचा प्रभावी वापर यावर मार्गदर्शन केले. दर्जेदार उत्पादनासाठी शास्त्रीय पद्धतीने लागवड करणे आवश्यक आहे. फक्त रासायनिक खतांचा वापर करून चालणार नाही तर जमिनीची उत्पादकता वाढविण्यासाठी सेंद्रिय खतांना पर्याय नाही. कुजलेले शेणखत, प्रक्रिया केलेले कोंबडी खत, लेंडी खत व प्रेसमडचा वापर जमिनीमध्ये करण्याचे आवाहन त्यांनी यावेळी उपस्थितांना केले. सौ. पूजा मोरे यांनी आपल्या मार्गदर्शनात शेतकऱ्यांनी आले प्रक्रिया उद्योगाकडे वळून आपली प्रगती साधावी असा सल्ला दिला. श्री. तेजदीप ढगे यांनी यावर्षी कमी पर्जन्यमान असल्यास शेतकऱ्यांनी पीक पद्धतीत कोणते बदल करावेत तसेच खरीप हंगामात कृषि विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या मोहिमांमध्ये सहभागी होऊन उत्पन्न वाढविण्याचे प्रयत्न करावेत असे आवाहन केले. श्री. अजय पवार यांनी कृषि विभागामार्फत राबविल्या जाणाऱ्या योजनांची माहिती दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. हेमलता फडतरे यांनी तर आभार श्री.असलम मुलांनी यांनी मानले. यावेळी पंचक्रोशीतील आले उत्पादक शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## निसराळेत उरमोडी धरण क्षेत्रांतर्गत चर्चासत्राचे आयोजन

**दि. २५ एप्रिल, २०२६.** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जल व्यवस्थापन पंधरवडानिमित्त महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी व कृषि विज्ञान केंद्र, बोरगाव यांच्या संयुक्त विद्यमाने निसराळे येथील अथर्व राज मंगल कार्यालयात उरमोडी धरणअंतर्गत विशेष चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आमदार श्री. मनोज घोरपडे होते. या चर्चासत्राचे आयोजन मा. जलसंपदा मंत्री ना. श्री. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते. यावेळी श्री. चंद्रकांत जाधव, जिल्हा परिषदेचे सदस्य श्री. अजित

वर्ष : ६, अंक क्रं. : ६४, एप्रिल, २०२६ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी





साळुंखे, पंचायत समितीच्या उपसभापती श्रीमती सुषमा जाधव, समृद्धी जाधव, बोरगाव कृषि विज्ञान केंद्राचे विषय विशेषज्ञ प्रा. भूषण यादगिरवार, मान्याची वाडीचे सरपंच श्री. रविंद्र माने, उरमोडी धरणाचे कार्यकारी अभियंता श्री. अमर काशीद, भाजपा तालुका अध्यक्ष श्री. संजय पाटील, सरचिटणीस श्री. गणेश जाधव, बाजार समितीचे संचालक श्री. जालिंदर आवळे उपस्थित होते.

यावेळी श्री. मनोज घोरपडे म्हणाले की शेतकऱ्यांना समृद्ध करणे हीच राज्य शासनाची प्रमुख भूमिका असून प्रत्येक शेताला पाणी पोहोचवण्यासाठी सरकार कटीबद्ध आहे. मात्र मिळालेल्या पाण्याचे योग्य व्यवस्थापन करणे ही शेतकऱ्यांची जबाबदारी आहे. यावेळी प्रा. भूषण यादगिरवार यांनी विविध पिकांमध्ये पाण्याचा वापर, विद्राव्य खते व सेंद्रिय शेती याविषयी माहिती दिली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री. अमर काशीद यांनी केले. यावेळी श्री. राजाराम जाधव, श्री. सुधीर जाधव, श्री. सुरेश माने, श्री. भरत माने, श्री. बाळासाहेब माने, श्री. मोहनराव जाधव, श्री. अमोल माळी, श्री. मधुकर यादव व श्री. शिवाजी डांगे यांच्यासह परिसरातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पसरणी, ता. वाई येथे सेंद्रिय निविष्ठा निर्मिती तंत्रज्ञान या विषयावर चर्चासत्र संपन्न



**दि. २७ एप्रिल, २०२६.** पसरणी, ता. वाई येथे दैनिक ॲग्रोवन कृषि विभाग, आत्मा (सातारा) आणि कृषि विज्ञान केंद्र, बोरगाव यांच्या संयुक्त विद्यमाने सेंद्रिय निविष्ठा निर्मिती तंत्रज्ञान या विषयावर चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी बोरगाव कृषि विज्ञान केंद्राचे विषय विशेषज्ञ प्रा. भूषण यादगिरवार, वाईचे उपविभागीय कृषि अधिकारी श्री. संतोषकुमार बरकडे, तालुका कृषि अधिकारी श्री. हरिचंद्र धुमाळ, मंडल कृषि अधिकारी श्री. रवींद्र बेलदार, उप कृषि अधिकारी श्री. किरण बाबर, ॲग्रोवन वितरण व्यवस्थापक श्री. योगेश निगडे, जिल्हा प्रतिनिधी श्री. विकास जाधव व वितरण प्रतिनिधी श्री. दत्तात्रय जाधव उपस्थित होते.

यावेळी मार्गदर्शन करताना प्रा. भूषण यादगिरवार म्हणाले की सेंद्रिय खत जसे की कोंबडी खत, जीवामृत आणि घन जीवामृत वापरल्यास शेतात गांडूळाची नैसर्गिकरीत्या मोठ्या प्रमाणात वाढ होते. मातीच्या रचनेत बदल झाल्याने जमिनीत हवेचे प्रमाण वाढून पिकाची मुळे खोलवर शिरतात. त्यामुळे पिकाला पाण्याचा ताण सहन करण्याची क्षमता तयार होत असते. सेंद्रिय कर्ब वाढविण्यासाठी शेतातील काडी कचरा कुजविणाऱ्या सूक्ष्मजीवांचा वापर करून खत तयार करण्याचे तंत्रज्ञान तसेच दशपर्णी अर्क, अग्निअस्त्र, घन जीवामृत, अझोला तयार करण्याची व वापरण्याची योग्य पद्धत याविषयी त्यांनी यावेळी माहिती दिली. श्री. संतोषकुमार बरकडे यांनी यावेळी शाश्वत शेती करण्यासाठी

रासायनिक खतांवरील खर्च कमी करून नैसर्गिक साधनांचा वापर करावा असे आवाहन उपस्थितांना केले. श्री. योगेश निगडे यांनी शेतकऱ्यांसाठी ॲग्रोवन मधून सुरू असलेल्या उपक्रमांची माहिती दिली. यावेळी जीवामृत, बियाणे उगवण क्षमता चाचणी इत्यादीचे प्रात्यक्षिक दाखविण्यात आले. याप्रसंगी शेतकरी श्री. दिलीप दौंड, श्री. मधुकर साबळे, श्री. प्रकाश कायगुंडे, श्री. योगेश जायकर, श्री. प्रवीण नाळे सौ.भाग्यश्री कदम, सौ. सुजाता पवार तसेच इतर शेतकरी उपस्थित होते.

## कृषि महाविद्यालय, हाळगाव येथे जागतिक आरोग्य दिन उत्साहात साजरा



**दि. १० एप्रिल, २०२६.** हाळगावच्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कृषि महाविद्यालयात सर्व अधिकारी, कर्मचारी आणि विद्यार्थ्यांसाठी जागतिक आरोग्य दिनाचे औचित्य साधून आहार, विहार, व्यायाम व HPV लसीकरण जागरूकता कार्यक्रमात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. दत्तात्रय सोनवणे होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणुन जामखेड येथील पंचायत समितीचे तालुका आरोग्य अधिकारी डॉ. सुनील बोराडे उपस्थित होते. यावेळी विद्यार्थी परिषद उपाध्यक्षा डॉ. प्रेरणा भोसले, मुख्य समुपदेशक डॉ. गोकुळ वामन, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. पोपट पवार, सहाय्यक प्राध्यापक (वनस्पती रोगशास्त्र) डॉ. मनोज गुड, वैद्यकीय अधिकारी डॉ. दिपक वाळुंजकर उपस्थित होते.

यावेळी अध्यक्षीय मार्गदर्शन करतांना डॉ. दत्तात्रय सोनवणे म्हणाले की विद्यार्थ्यांनी चांगला आहार, चांगला व्यवहार व तत्वे जीवनात रुजविली पाहिजेत. दररोजच्या जेवणात पोषकतत्वयुक्त आहाराचे सेवन केले पाहिजे. जागतिक आरोग्य दिनाच्या सर्वांसाठी आरोग्य या संदेशातून कुटुंबातील सदस्यांचे आरोग्य निरोगी ठेवण्यासाठी प्रयत्न करण्याचे त्यांनी यावेळी सूचित केले. याप्रसंगी डॉ. सुनील बोराडे म्हणाले की आधुनिक जीवनशैली व असंतुलित आहारामुळे युवा पिढी विविध विकारांनी ग्रस्त आहे. नवीन पिढीतील युवकांमध्ये मधुमेह, रक्तदाब, हृदयविकार, अनेमिया, आहारद्रव्यांची कमतरता, कर्करोग यासारख्या आजारांची लक्षणे दिसून येतात ही धोक्याची बाब आहे. शारीरिक, मानसिक व आध्यात्मिक आरोग्य निरोगी असणे गरजेचे आहे. त्यासाठी चौरस आहारासोबत सुंदर विचारांची सोबत असावी. संतुलित आहार हे सर्व आजारांवरील औषध आहे. यावेळी महाविद्यालयाचे वैद्यकीय अधिकारी डॉ. दिपक वाळुंजकर यांनी कार्यक्रमाच्या आयोजनामध्ये विशेष भूमिका बजावली. अधिकारी, कर्मचारी व विद्यार्थी यांचे आरोग्य सुस्थितीत ठेवण्याच्या उद्देशाने या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. सदर कार्यक्रमास एकूण १३६ अधिकारी, कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. सहाय्यक प्राध्यापिका (पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र) डॉ. निकीता धाडगे यांनी प्रमुख अतिथींचा परिचय करून दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार सहाय्यक प्राध्यापिका (कृषि विस्तार) डॉ. प्रणाली ठाकरे यांनी केले.

## कृषि महाविद्यालय, हाळगाव येथे क्रांतिसूर्य महात्मा फुले यांची जयंती साजरी

**दि. ११ एप्रिल, २०२६.** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कृषि महाविद्यालय, हाळगाव येथे राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत क्रांतिसूर्य महात्मा जोतिबा फुले यांची १९९ वी जयंती साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाच्या प्रारंभी सहयोगी अधिष्ठाता डॉ. दत्तात्रय सोनवणे यांच्या हस्ते महात्मा जोतिबा फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर, सहाय्यक प्राध्यापक (कृषि कीटकशास्त्र) डॉ. धनेश्वर पाटील यांनी महात्मा जोतिबा फुले यांनी सामाजिक सुधारणा, स्त्री शिक्षण, शेतकरी आणि अस्पृश्यता निर्मूलनासाठी केलेले



महत्वपूर्ण कार्य समजावून सांगितले. थोर समाजसुधारक महात्मा फुले यांनी शेतकऱ्यांच्या हितार्थ केलेल्या कार्याचा गौरव म्हणून कृषि विद्यापीठस त्यांचे नाव देण्यात आले आहे असे त्यांनी आपल्या मनोगतातून स्पष्ट केले. स्वयंसेवक चि. अभिमन्यू ढुस यांनी महात्मा जोतिबा फुले यांच्या प्रेरणादायी कार्याची माहिती सांगितली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन चि. हर्षल काकडे यांनी केले. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

## कृषि महाविद्यालय, हाळगाव येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी



**दि. १४ एप्रिल, २०२६.** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कृषि महाविद्यालय, हाळगाव येथे राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती साजरी करण्यात आली. यावेळी कार्यक्रमाच्या सुरुवातीला सहयोगी अधिष्ठाता डॉ. दत्तात्रय सोनवणे यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अपर्ण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर स्वयंसेवक चि. अभिमन्यू ढुस व कु. श्रावणी रोडे यांनी आपल्या मनोगतातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या बहुआयामी कार्याची माहिती सांगताना, आंबेडकरांनी केवळ भारतीय संविधानाची निर्मितीच केली नाही तर समाजातील वंचित, शोषित आणि मागासवर्गीय घटकांच्या हक्कांसाठी आयुष्यभर संघर्ष केला. शिक्षण हेच खरे मुक्तीचे साधन असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. विद्यार्थ्यांनी ज्ञान, शिस्त आणि परिश्रम यांच्या बळावर स्वतःचा आणि समाजाचा विकास साधावा, तसेच संविधानातील मूल्ये आपल्या दैनंदिन जीवनात आचरणात आणावीत असे स्पष्ट केले. तसेच कु. ज्योती दौड, कु. प्राची शिंदे व कु. तेजस्वीनी गळवे यांनी आपल्या मनोगतातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचे महत्त्व अधोरेखित करताना सांगितले की, समता, स्वातंत्र्य आणि बंधुता ही तत्त्वे आजच्या समाजासाठी अत्यंत आवश्यक आहेत. त्यांनी आंबेडकरांच्या सामाजिक चळवळींचा उल्लेख करत विद्यार्थ्यांनी सामाजिक जाणीव ठेवून कार्य करण्याचे आवाहन केले. समाजातील अंधश्रद्धा, जातीय भेदभाव आणि अन्याय दूर करण्यासाठी प्रत्येकाने भारतीय जागरूक नागरिक म्हणून योगदान द्यावे असे त्यांनी सांगितले. तसेच शिक्षणाच्या माध्यमातूनच समाज परिवर्तन शक्य असून विद्यार्थ्यांनी आपल्या कर्तृत्वाने समाजात सकारात्मक बदल घडवून आणावा असे प्रेरणादायी विचार मांडले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. ऋतुजा मोरे यांनी केले. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## कृषि महाविद्यालय, हाळगाव येथे महात्मा बसवेश्वर यांची जयंती साजरी



**दि. १९ एप्रिल, २०२६.** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कृषि महाविद्यालय, हाळगाव येथे राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत महात्मा बसवेश्वर यांची जयंती साजरी करण्यात आली. याप्रसंगी सहयोगी अधिष्ठाता डॉ. दत्तात्रय सोनवणे यांनी महात्मा बसवेश्वर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून पूजन केले, तसेच इतर शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी प्रतिमेस अभिवादन केले. त्यानंतर स्वयंसेवक कु. ऋतुजा मोरे, कु. ज्योती दौंड, कु. प्राची शिंदे, कु. वैष्णवी कदम यांनी महात्मा बसवेश्वर यांच्या सामाजिक व धार्मिक कार्यावर प्रकाश टाकला. महात्मा बसवेश्वर हे १२ व्या शतकातील एक महान भारतीय तत्ववेत्ता, समाजसुधारक, कवी आणि वीरशैव लिंगायत धर्माचे संस्थापक होते. त्यांनी जातीव्यवस्था, अंधश्रद्धा आणि विषमतेविरुद्ध संघर्ष केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन चि. हर्षल काकडे यांनी केले. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

## कृषि महाविद्यालय, हाळगाव येथे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांची जयंती साजरी



**दि. ३० एप्रिल, २०२६.** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शासकीय कृषि महाविद्यालय, हाळगाव येथे राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत राष्टसंत तुकडोजी महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली. याप्रसंगी सहयोगी अधिष्ठाता डॉ. दत्तात्रय सोनवणे यांनी तुकडोजी महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून पूजन केले. तसेच इतर शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी प्रतिमेस अभिवादन केले. त्यानंतर स्वयंसेवक कु. मयुरी गाजरे, कु. प्राची शिंदे व चि. प्रविण पाटील यांनी राष्टसंत तुकडोजी महाराज हे महाराष्ट्रातील एक आधुनिक संत, समाजसुधारक, कवी आणि खंजिरी भजनी होते. अंधश्रद्धा निर्मूलन, ग्रामविकास आणि सामाजिक समतेसाठी त्यांनी ग्रामगीता ग्रंथ आणि खंजिरी भजनांच्या माध्यमातून प्रबोधन केले अशी माहिती आपल्या मनोगतातून सांगितली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन चि. प्रविण पाटील यांनी केले. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

## ॲग्रोवनच्या २१ व्या वर्धापन दिनानिमित्त ॲग्रोवन संवाद चर्चासत्राचे आयोजन

**दि. ३० एप्रिल, २०२६.** दिवे (ता. पुरंदर) येथील श्री कातोबा मंदिरात सकाळ ॲग्रोवन, कृषि विभाग, पुणे आणि कृषि तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा (आत्मा) यांच्या संयुक्त विद्यमाने ॲग्रोवनच्या २१ व्या वर्धापन दिनानिमित्त सिताफळ आणि अंजीर फळपिक एकात्मिक व्यवस्थापन या विषयावर ॲग्रोवन संवाद चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रगतशील शेतकरी श्री. मुरलीधर झेंडे होते. यावेळी पुरंदर येथील अंजीर सिताफळ योजना संशोधन केंद्राचे प्रभारी अधिकारी डॉ. प्रदीप दळवे, वनस्पती रोगशास्त्रज्ञ डॉ. युवराज बालगुडे, सकाळ ॲग्रोवनचे वरिष्ठ व्यवस्थापक श्री. योगेश निगडे उपस्थित होते.





यावेळी डॉ. प्रदीप दळवे यांनी आपल्या मार्गदर्शनामध्ये सांगितले की हवामान बदलामुळे वाढते तापमान, अनियमित पाऊस आणि बदलत्या वातावरणाचा फटका शेतीला बसत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी शेतीमध्ये योग्य नियोजन करणे आवश्यक आहे. यावेळी त्यांनी अंजीर व सीताफळ पिकातील बहार व्यवस्थापन, भौगोलिक मानांकन हवामान बदलामुळे होणारे नुकसान आणि त्यावरील उपाय योजना याबाबत मार्गदर्शन केले. डॉ. युवराज बालगुडे यांनी कीड व रोग व्यवस्थापनावर मार्गदर्शन केले. मावा, तुडतुडे, लाल कोळी यासारख्या किडींची ओळख, नियंत्रण उपाय, बोर्ड मिश्रण फवारणी, सेंद्रिय कर्ब वाढविणे आणि सापळ्यांचा वापर याबाबत त्यांनी माहिती दिली. यावेळी कृषि विभाग आणि आत्मा यांच्यावतीने शिवार फेरीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी अंजीर व सीताफळ बागांना भेटी देत शास्त्रज्ञांनी प्रात्यक्षिकांसह सविस्तर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री. योगेश निगडे यांनी केले. सूत्रसंचालन श्री. महेश चौखंडे यांनी तर आभार प्रगतशील शेतकरी श्री. गणपत शितकल यांनी मानले. या कार्यक्रमास प्रगतशील शेतकरी श्री, सुरेश टिळेकर, श्री. दिलीप जाधव, श्री. दादा झेंडे, श्री. पांडुरंग टिळेकर, श्री. प्रशांत टिळेकर, श्री. दीपक गुरव, श्री. गुलाब घुले, श्री. गणेश झेंडे, कृषि विद्यापीठाचे माजी प्राचार्य डॉ. ठवाळ, कृषि अधिकारी श्री. श्रीधर चव्हाण तसेच आत्म्याच्या श्रीमती स्मिता वर्पे उपस्थित होत्या.

## संत मुक्ताई कृषि महाविद्यालय, मुक्ताईनगर येथे महात्मा जोतिबा फुले जयंती उत्साहात साजरी



**दि. ११ एप्रिल २०२६.** संत मुक्ताई कृषि महाविद्यालय, मुक्ताईनगर येथे महात्मा जोतिबा फुले यांची जयंती महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. संदीप पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या प्रारंभी उपस्थित मान्यवरांनी महात्मा जोतिबा फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन केले. या कार्यक्रमात महाविद्यालयातील विद्यार्थी–विद्यार्थिनींनी मनोगत व्यक्त करत महात्मा फुले यांच्या सामाजिक, शैक्षणिक व मानवतावादी कार्याविषयी कृतज्ञता व्यक्त केली. डॉ. ऐश्वर्या पाटील यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की महात्मा फुले यांनी शिक्षण, समता आणि सामाजिक न्यायासाठी केलेले कार्य आजही प्रेरणादायी आहे. विद्यार्थ्यांनी त्यांच्या विचारांचा आदर्श घेऊन समाजाच्या प्रगतीसाठी योगदान द्यावे असे त्यांनी आवाहन केले. सहाय्यक प्राध्यापक डॉ. सागर बंड यांनी आपल्या

भाषणात महात्मा फुले यांच्या जीवनकार्याचा आढावा घेतला. महिलांच्या व वंचित घटकांच्या शिक्षणासाठी त्यांनी केलेले कार्य अधोरेखित करताना त्यांनी सांगितले की, तुम्ही एखाद्या पुरुषाला शिक्षित केले तर एक व्यक्ती शिक्षित होते. परंतु एका महिलेला शिक्षित केल्यास संपूर्ण कुटुंब शिक्षित होते. हा त्यांचा विचार आजही तितकाच महत्त्वाचा आहे. गुलामगिरी हे त्यांचे पुस्तक आजही क्रांतिकारक मानले जाते, असेही त्यांनी नमूद केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. कोमल पाटील हिने केले तर आभार कौस्तुभ होनमाने याने मानले. यानंतर महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या सूचनेनुसार महाविद्यालय परिसरात स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी तसेच सहाय्यक कार्यक्रम अधिकारी डॉ. कुशल ढाके व डॉ. ऐश्वर्या पाटील यांनी विशेष परिश्रम घेतले.

## संत मुक्ताई कृषि महाविद्यालय, मुक्ताईनगर येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात साजरी



**दि. १४ एप्रिल २०२६.** संत मुक्ताई कृषि महाविद्यालय, मुक्ताईनगर येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. संदीप पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली उत्साहात साजरी करण्यात आली. याप्रसंगी उपस्थित मान्यवरांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन केले. कार्यक्रमात बोलताना सहाय्यक प्राध्यापक डॉ. सागर बंड यांनी डॉ. आंबेडकर यांच्या कार्याची आठवण करून दिली. त्यांनी सांगितले की, भारतीय संविधानाने नागरिकांना मूलभूत अधिकार दिले असले तरी त्याचबरोबर प्रत्येकाने आपली मूलभूत कर्तव्येही प्रामाणिकपणे पार पाडली पाहिजेत. सहाय्यक प्राध्यापक डॉ. कुशल ढाके यांनी आपल्या भाषणात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनकार्याचा आढावा घेतला. त्यांनी स्पष्ट केले की, डॉ. आंबेडकर हे प्रख्यात न्यायशास्त्रज्ञ, अर्थशास्त्रज्ञ, राजकारणी, तत्त्वज्ञ आणि समाजसुधारक होते. त्यांनी दलित बौद्ध चळवळीला प्रेरणा दिली तसेच सामाजिक भेदभावाविरुद्ध लढा उभारला. महिलांचे व कामगारांचे हक्क संरक्षणासाठी त्यांनी मोलाचे कार्य केले. ते स्वतंत्र भारताचे पहिले कायदेमंत्री तसेच भारतीय संविधानाचे शिल्पकार होते. देशाच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांनी दिलेल्या योगदानामुळे त्यांना आधुनिक भारताचे शिल्पकार असे संबोधले जाते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. कादंबरी चौधरी हिने केले तर आभार कौस्तुभ होनमाने याने मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी तसेच सहाय्यक कार्यक्रम अधिकारी डॉ. कुशल ढाके व डॉ. ऐश्वर्या पाटील यांनी विशेष परिश्रम घेतले.

**प्रकाशक** : डॉ. गोरक्ष ससाणे
संचालक, विस्तार शिक्षण

**प्रमुख संपादक** : डॉ. सचिन सदाफळ
प्रभारी अधिकारी, प्रसारण केंद्र

**सहसंपादक** : श्री. सुनिल राजमाने
कनिष्ठ संशोधन सहाय्यक, प्रसारण केंद्र

**डिझाईनर** : श्री. प्रदिप कोळपकर
कलाकार तथा छायाचित्रकार, प्रसारण केंद्र
श्री. सिध्दार्थ साळवे
लिपीक–नि–टंकलेखक, प्रसारण केंद्र

मफुकृवि विस्तार प्रकाशन क्र. २९५१/२०२६